आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१७ सप्टेंबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात सर्वत्र गणेशविसर्जनाचा उत्साह/ ठिकठिकाणी मिरवणुकांना प्रारंभ
- मराठवाडा मुक्तीदिनानिमित्त मराठवाड्यातल्या आठही जिल्ह्यांमधे ध्वजवंदनेचा कार्यक्रम संपन्न
- ऑगस्ट-२०२४ मधे घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याच्या दरात एक पूर्णांक ३१ शतांश टक्के घट

  **आणि**
- ‘स्वच्छता ही सेवा अभियान २०२४’ ला सुरुवात

**<><><><><>**

गणेशचतुर्थी पासून सुरु झालेल्या गणेशोत्सवाची आज सांगता होत आहे. लाडक्या गणरायाला पुढच्या वर्षी येण्याचं आमंत्रण देत वाजत गाजत निरोप देण्यात येत आहे. महाराष्ट्रात मोठमोठ्या मिरवणुकांचा प्रारंभ झाला आहे. मुंबईच्या गणेशविसर्जन मिरवणुकांची माहिती आमच्या प्रतिनिधी कडून....

**व्हॉईसकास्ट- अंकिता आपटे**

*( विसर्जनस्थळांकडे जाणारे रस्ते गर्दीने फुलून गेले आहेत. ढोल ताशा लेझीम आणि बाजाच्या संगीतावर उत्फुल्लपणे सर्वजण गुलालाची, फुलांची उधळण करीत आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देत आहेत.  लालबागचा राजा, तेजुकाया मॅन्शन, गणेशगल्ली इत्यादी प्रसिद्ध मंडळांच्या महाकाय मूर्ती मिरवणुकीने निघाल्या आहेत. विसर्जन सोहळ्यासाठी मुंबई महापालिकेने जय्यत तयारी केली आहे. महापालिकेचे सुमारे १२ हजार अधिकारी - कर्मचारी विसर्जन स्थळांवर तैनात आहेत. गिरगाव,*

*दादर, जुहू इत्यादी समुद्रकिनाऱ्यांसह ६९ नैसर्गिक स्थळांसह एकूण २०४ कृत्रिम विसर्जनस्थळांवर विसर्जन सुरू झालं आहे. चौपाटीवर विसर्जनासाठी येणारी वाहनं वाळूमध्ये अडकू नयेत यासाठी किना-यांवर ४७८ स्टील प्लेट टाकण्यात आल्या आहेत. छोट्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी विविध ठिकाणी ४३ जर्मन तराफ्यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. चौपाट्यांवर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलीस, ७६१ जीवरक्षकांसह ४८ मोटरबोटी तैनात केल्या आहेत, निर्माल्य गोळा करण्यासाठी १६३ निर्माल्य कलशांसह २७४ निर्माल्य वाहनांचीही सोय करण्यात आली आहे. १९२ नियंत्रण कक्ष तर सुरक्षेच्या दृष्टीने ६६ निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहेत. आरोग्य विभागाकडून ७५ प्रथमोपचार केंद्रांसह ६७ रुग्णवाहिका देखील सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.)*

पुण्यातही कसबा, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग, केसरीवाडा हे मानाचे पाच गणपती विसर्जनासाठी निघाले आहेत. याखेरीज नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर इत्यादी प्रमुख शहरांमधे गणेशविसर्जनाला वाजत गाजत प्रारंभ झाला आहे.

राज्यात इतरत्रही ठिकठिकाणी गणेशविसर्जनाचा उत्साह दिसत असून तिथल्या बातम्या आमच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २२ नैसर्गिक आणि १३७ कृत्रिम अशा १५९ विसर्जन स्थळांवर आज अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश मूर्तीचं विसर्जन करण्यात येणार आहे. स्वयंसेवक आणि लाईफगार्ड्स तसंच अग्निशमन दलाचे जवान तैनात असणार आहेत. आवश्यक तिथं यांत्रिक तराफ्यांची सोयही उपलब्ध आहे.

नागपूर मधे महापालिका प्रशासनाने मूर्तीच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची व्यवस्था केली आहे. शहरात ३४ ठिकाणी मूर्तीचे विसर्जन होणार आहे. ठिकठिकाणी

पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मुख्य विसर्जनस्थळी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

नाशिकमध्ये विसर्जन मिरवणूकांना प्रारंभ झाला  आहे. नाशिक शहरातील मुख्य मिरवणूकीचा प्रारंभ पालकमंत्री दादा भुसे यांनी केला. यावेळी विविध पक्षांचे नेते आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते. वाकडी बारव येथून ही मिरवणूक सुरू झाली आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, अमेरिकेतल्या गणेशोत्सवाविषयी.

**<><><><><>**

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त आज महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. मराठवाड्यातल्या बेरोजगारी, पाणीटंचाई, यासारख्या समस्या सोडवण्यासाठी सरकार वचनबद्ध असून, कृषी, दळणवळण, उद्योग, पायाभुत सुविधा अशा सर्व क्षेत्रात मराठवाड्याची प्रगती करणं हेच शासनाचं ध्येय आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.  मराठवाड्यातल्या आठही जिल्ह्यांमध्ये आज ध्वजारोहणाचे कार्यक्रम झाले. परभणी इथं पालकमंत्री संजय बनसोडे, हिंगोली इथं पालकमंत्री अब्दुल सत्तार, धाराशिव इथं तानाजी सावंत, जालना इथं अतुल सावे, बीड इथं धनंजय मुंडे, नांदेडमध्ये गिरीश महाजन आणि लातूरमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

मराठवाड्यातल्या सर्व जिल्ह्यांत आज मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा होत आहे. हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी इथल्या दारव्हेकर कला अकादमीत भव्य रांगोळी काढण्यात आली. याद्वारे ५२ स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन करण्यात आलं. बीडमध्ये हुतात्मा चौक इथल्या स्मारकाला २१ तोफांची सलामी देण्यात आली, त्यानंतर पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पुष्पचक्र अर्पण करून हुत्मात्यांना आदरांजली वाहिली. धाराशिवमध्येही पोलिसांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडून शहिदांना मानवंदना दिली.

तेलंगणामध्येही आज हैदराबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं.

<><><><><>

समाजसुधारक, झुंजार पत्रकार आणि विचारवंत प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजीनगरमधे आयोजित कार्यक्रमात आदरांजली वाहिली. हिंगोली इथं जिल्हाधिकारी कार्यालयात प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली.

प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती नवी दिल्ली इथल्या महाराष्ट्र सदनात आज साजरी करण्यात आली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे मुंबईत प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली.

<><><><><>

वाहन प्रवासी आणि वाहन कंपन्यांनी शाश्वत पद्धतींचा अवलंब करावा तसंच सीएनजी, हरित हायड्रोजन आणि जैव-इथेनॉल सारख्या पर्यायी, हरित इंधनाचा वापर

करावा, असं आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. ते आज उत्तर प्रदेशात गाझियाबाद इथं स्वच्छता ही सेवा या अभियानंतर्गत झालेल्या स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता या कार्यक्रमात बोलत होते. रस्ते आणि महामार्गांच्या बांधकामाच्या प्रक्रियेत निर्माण होत असलेल्या प्रदूषणकारी घटकांपासून पर्यावरणाचं रक्षण करायला सरकारनं सर्वोच्च प्राधान्य दिलं असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

गेल्या महिन्यात घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याच्या दरात एक पूर्णांक ३१ शतांश टक्के घट झाली आहे. इंधनाच्या दरात घट झाल्यामुळे तसंच अन्नपदार्थांची दरवाढ मंदावल्यामुळे ही घट झाल्याचं सरकारी आकडेवारीत म्हटलं आहे. गेल्या जुलैमधे हा दर पावणेचार टक्के होता तो ऑगस्टमधे तीन पूर्णांक ११ शतांश टक्के झाला. ऑगस्ट महिन्यात किरकोळ किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर पाच शतांश टक्क्यांनी वाढला. जुलैमधे हा दर तीन पूर्णांक सहा दशांश टक्के होता तो ऑगस्टमधे तीन पूर्णांक ६५ शतांश टक्के झाला. ही वाढ होऊन देखील रिझर्व बँकेनं निर्धारित केलेल्या ४ टक्के दराच्या आतच चलनफुगवट्याचा दर राहीला आहे.

**<><><><><>**

देशभरात आजपासून ‘स्वच्छता ही सेवा अभियान २०२४’ ला सुरुवात झाली. येत्या २ ऑक्टोबरपर्यंत हे अभियान सुरू असेल. स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता ही यंदाच्या अभियानाची संकल्पना आहे. यंदाच्या अभियानासाठी संपूर्ण समाजाचा सहभाग असावा या दृष्टीने श्रमदान मोहिमा, जन भागिदारी आणि सफाई मित्र हे तीन

प्रमुख स्तंभ म्हणून निश्चित केले गेले आहेत. या अभियाना अंतर्गत पर्यटनस्थळं, सार्वजनिक इमारती, व्यापारी क्षेत्र, पाणवठे, प्राणिसंग्रहालयं, अभयारण्ये, सामुदायिक आणि सार्वजनिक स्वच्छतागृह अशा विविध ठिकाणी स्वच्छताविषयक श्रमदान आणि सामूहिक मोहिमा राबवल्या जाणार आहेत.

या अभियानाच्या निमित्तानं आज ठिकठिकाणी स्वच्छताविषयक शपथ ग्रहण कार्यक्रमांचं आयोजन केलं गेलं. याअंतर्गत राज्यात विविध रेल्वे स्थानकं, आकाशवाणीची मुंबईसह इतर प्रादेशिक केंद्र, तसंच केंद्र सरकारच्या अखत्यारितील विविध कार्यालयांमध्ये स्वच्छताविषयक शपथ दिली गेली.

**<><><><><>**

आठव्या भारत जल सप्ताह २०२४ ची सुरुवात आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत झाली. आझादी का अमृत महोत्सवाच्या काळात अमृत सरोवरांची निर्मिती करण्यात आली तसंच अनेक जलकुंभांचं पुनरुज्जीवन करण्यात आलं, असं राष्ट्रपतींनी यावेळी सांगितलं. भारतीय धर्मग्रंथात हजारो वर्षांपासून जलसंधारणाचं महत्व सांगितल्याचंही त्या म्हणाल्या.

चार दिवसांच्या या कार्यक्रमात ४० देशातले दोनशे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात शंभरहून अधिक दालनं आणि जल क्षेत्रातले स्टार्टअप्स आपल्या संकल्पना मांडणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७४व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांना शुभेच्छा

दिल्या आहेत. मोदी यांनी त्यांच्या कार्यातून देशाची समृद्धी आणि प्रतिष्ठा उंचावली आहे. त्यांना निरोगी आणि आनंदी दीर्घायुष्याच्या शुभेच्छा, असं राष्ट्रपती मुर्मू आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हणाल्या आहेत. तर मोदी यांनी प्रधानमंत्री पदाच्या कार्यकाळात भारताला विकासाच्या मार्गावर नेलं असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विश्वकर्मा जयंती निमित्त सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये प्रधानमंत्र्यांनी निर्मिती आणि बांधकाम क्षेत्रातल्या कारागीरांना अभिवादन केलं. विकसित आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यात त्यांचं योगदान अमूल्य असल्याचं मोदी म्हणाले.

**<><><><><>**

इतर भाषांचा आदर बाळगून हिंदीला प्रोत्साहन देणं गरजेचं असल्याचं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सहगल यांनी म्हटलं आहे. हिंदी दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी तसंच आकाशवाणीच्या महासंचालक प्रज्ञा पालिवाल यावेळी उपस्थित होत्या.

आकाशवाणी मुंबई केंद्रातही हिंदी दिवस आणि हिंदी पखवाडा प्रारंभानिमित्त विशेष कार्यक्रम झाला.

**<><><><><>**

आम आदमी पार्टीच्या नेत्या आतिशी यांची पक्षाच्या विधिमंडळ नेतेपदी आज निवड करण्यात आली आहे. आतिशी या दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री असतील हे आता स्पष्ट झालं आहे. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची दोन दिवसांपूर्वी

जामिनावर सुटका झाल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली होती. केजरीवाल आज संध्याकाळी नायब राज्यपाल व्ही के सक्सेना यांना भेटून पदाचा राजीनामा देणार आहेत.